**टाटा ॲसेट मॅनेजमेन्ट सादर करीत आहे टाटा मल्टिकॅप फंड**
**~ एनएफओ 16 जानेवारीला सुरू होत आहे व 30 जानेवारीला बंद होत आहे ~**

**मुंबई, 13 जानेवारी 2023:** टाटा ॲसेट मॅनेजमेन्ट हे लार्ज कॅप, मिड कॅप, स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करणाऱ्या टाटा मल्टिकॅप फंड ह्या ओपन एन्डेड इक्विटी स्किमच्या प्रारंभाची घोषणा करीत आहेत. गुंतवणूकीसाठी नवीन फंड सादर करणारी विंडो 16 जानेवारी 2023 रोजी सुरू होईल आणि 30 जानेवारी 2023 रोजी बंद होईल. त्यानंतर वाटप झाल्यावर सातत्यपूर्ण विक्री आणि पुनर्खरेदीसाठी ही योजना नव्याने सुरू होईल.

ह्या उद्‌घाटनाच्या प्रसंगी भाषण करताना राहुल सिंग, सीआयओ- इक्विटीज्, टाटा ॲसेट मॅनेजमेन्ट म्हणाले, "टाटा मल्टिकॅप फंड हा बाजारपेठेतील भांडवल/मार्केट कॅप्स धोरणे, विषय क्षेत्र तसेच औद्योगिक क्षेत्र अशासारख्या विविध बाबींवर लक्ष केंद्रित करतो, ज्यामुळे योग्य किंमतीमध्ये वाढ मिळू शकेल कारण एकंदरीतच पोर्टफोलिओमध्ये जोखमीशी जुळवून मिळणारे परतावे सुधारण्याचा आणि गुंतवणूकदाराला एक सुलभ आनंददायी अनुभव पुरविण्याचा हाच मार्ग असेल. आम्हाला असा विश्वास वाटतो की पुढील ३-५ वर्षांसाठी भारताला मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास होण्याच्या शक्यता लक्षात घेता हा फंड एक उत्कृष्ट क्षमतेचा फंड म्हणून ओळखला जाईल."

ह्या फंडाचा पोर्टफोलिओ हा स्थैर्य आणि संधी यांच्या दरम्यान योग्य समतोल देण्याचा हेतू बाळगून मिळकतीच्या चक्राच्या विविध टप्प्यांवर असणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्स पासून तयार झालेला असेल. मिळकतीच्या आवर्तनाच्या ह्या तीन क्षेत्रांची ढोबळ मानाने स्थैर्य मिळविणे, मिळकतीमध्ये वाढ आणि अर्निंग्स टर्न अराउंड अशी विभागणी करता येऊ शकेल. अशा प्रकारच्या एकत्रीकरणामुळे आपल्याला (1) आधार देऊ शकणाऱ्या स्थिर गतीने प्रगती करणाऱ्या कंपन्या. (2) उत्पन्नाच्या चक्रातील बदलामुळे लाभ होणाऱ्या कंपन्या ज्या मूल्यांकनाच्या रिरेटींगला कारण होतील आणि (3) शेवटी उद्योग किंवा व्यवस्थापनातील बदलांमुळे निर्माण होणाऱ्या विपरीत परिस्थिती मधूनही सुधारणा होत असणाऱ्या कंपन्या होण्यास मदत होईल.

याची निफ्टी 500 मल्टिकॅप 50:25:25 टोटल रिटर्न इंडेक्स यांच्यामध्ये बेंचमार्क झालेली आहे आणि ती तुम्हाला दोन प्लॅन्स देते: रेग्युलर आणि डायरेक्ट.


1903 B-Wing Parinee Crescenzo G-Block Bandra Kurla Complex Bandra East Mumbai 400 051
Tel 91 22 6657 8282 Fax 91 22 6617 8288
e-mail service@tataamc.com website www.tatamutualfund.com
U65990 MH 1994 PTC 077090

**फंडाची माहिती:**

| | |
|---|---|
| **स्किमचे नाव** | **टाटा मल्टिकॅप फंड** |
| **एनएफओ तारीख** | 16 जानेवारी 2023 ते 30 जानेवारी 2023 |
| **गुंतवणूकीचे उद्दिष्ट** | विविध मार्केट कॅपिटलायझेशनमधील इक्विटीज व इक्विटीशी संबंधित सिक्युरिटीजच्या पोर्टफोलिओद्वारे दीर्घ मुदतीत भांडवल वृद्धी साध्य करणे हे ह्या योजनेचे गुंतवणुकीचे उद्दिष्ट आहे. परंतु, योजनेचे गुंतवणुकीचे उद्दिष्ट साध्य होईल याची खात्री देता येणार नाही. योजनेद्वारा परताव्याची कोणतीही खात्री किंवा ग्वाही दिली जात नाही. |
| **स्किमचा प्रकार** | लार्ज कॅप, मिड कॅप, स्मॉल कॅप स्टॉक्समध्ये गुंतवणूक करणारी ओपन-एन्डेड इक्विटी योजना |
| **फंड व्यवस्थापक** | राहूल सिंग (इक्विटी), मुर्थी नागराजन (डेट) आणि अरविंदकुमार चेट्टी (ओव्हरसीज) |
| **सह-फंड व्यवस्थापक** | तेजस गुटका (इक्विटी) |
| **बेंचमार्क** | निफ्टी 500 मल्टीकॅप 50:25:25 टीआरआय |
| **गुंतवणूकीची किमान रक्कम (एनएफओच्या दरम्यान)** | रू.5,000/- आणि त्यानंतर रू.1/- च्या पटीत |
| **भाररचना** | **आगमन भार :** लागू नाही<br><br>**निर्गमन भार :** वाटप झाल्याच्या तारखेपासून 365 दिवस संपल्यावर किंवा त्यापूर्वी रिडम्पशन/स्वीच आऊट/एसडब्ल्यूपी/एसटीपी : काढून घेतलेली रक्कम किंवा स्वीच आऊट केलेली रक्कम गुंतवणूकीच्या मूळ मूल्याच्या 12% पेक्षा जास्त नसल्यास- काही नाही. |

TATA ASSET MANAGEMENT PRIVATE LIMITED
1903 B-Wing Parinee Crescenzo G-Block Bandra Kurla Complex Bandra East Mumbai 400 051
Tel 91 22 6657 8282 Fax 91 22 6617 8288
e-mail service@tataamc.com website www.tatamutualfund.com
U65990 MH 1994 PTC 077090

वाटप झाल्याच्या तारखेपासून 365 दिवस संपल्यावर किंवा त्यापूर्वी रिडम्पशन/स्वीच आऊट/एसडब्ल्यूपी/एसटीपी : काढून घेतलेली रक्कम किंवा स्वीच आऊट केलेली रक्कम गुंतवणूकीच्या मूळ मूल्याच्या 12% पेक्षा जास्त असल्यास - 1%.

वाटप झाल्याच्या तारखेपासून 365 दिवसांचा मुदत संपल्यानंतर रिडम्पशन/स्वीच आऊट/एसडब्ल्यूपी/एसटीपी - काही नाही.

**TATA**

**मल्टिकॅप फंड**

**(लार्ज कॅप, मिड कॅप, स्मॉल कॅप स्टॉक्समध्ये गुंतवणूक करणारी ओपन-एन्डेड इक्विटी योजना)**

**(योजनेचा कोड TATA/O/E /MCF/22/10/0053)**

**हे उत्पादन अशी अपेक्षा असणाऱ्या गुंतवणुकदारांसाठी योग्य आहे*:**

- दीर्घ मुदतीत भांडवल वृद्धी निर्माण करण्यासाठी.
  लार्ज कॅप, मिड कॅप, स्मॉल कॅप स्टॉक्समध्ये गुंतवणूक करणारी ओपन-एन्डेड इक्विटी योजना

***हे उत्पादन त्यांच्यासाठी योग्य आहे का ह्याबद्दल शंका असल्यास गुंतवणूकदारांनी त्यांच्या आर्थिक सल्लागाराचा सल्ला घ्यावा.**

**योजनेचे रिस्क-ओ-मीटर**




गुंतवणूकदारांना याची जाणीव असते की त्यांच्या मुद्दल रकमेला सर्वसाधारण जास्त जोखीम आहे.

**बेंचमार्क रिस्क-ओ-मीटर**
**(निफ्टी 500 मल्टीकॅप 50:25:25 टीआरआय)**




याची नोंद घ्यावी की वर दर्शविण्यात आलेले रिस्क-ओ-मीटर हे एनएफओच्या दरम्यान करण्यात आलेल्या अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आहे. त्याचा सेबी द्वारा नमूद करण्यात आलेल्या वारंवारितेने आढावा घेण्यात येईल आणि त्यात सुधारणा करण्यात येईल.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारपेठेतील जोखमींच्या अधीन आहे, योजनेशी संबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचा.

TATA ASSET MANAGEMENT PRIVATE LIMITED
1903 B-Wing Parinee Crescenzo G-Block Bandra Kurla Complex Bandra East Mumbai 400 051
Tel 91 22 6657 8282 Fax 91 22 6617 8288
e-mail service@tataamc.com website www.tatamutualfund.com
U65990 MH 1994 PTC 077090

**टाटा ॲसेट मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड विषयी।**

वर्ष 1994 मध्ये स्थापना झालेली टाटा ॲसेट मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड ही टाटा म्युच्युअल फंडाची गुंतवणूक व्यवस्थापक आहे. भारतातील सर्वात विश्वासपात्र बिझिनेस हाऊसपैकी एक असणाऱ्या भारतातील सर्वात जुन्या म्युच्युअल फंडापैकी ही एक असून तिचा गुंतवणूक आधार 28,00,000 पेक्षा जास्त आहे. टाटा म्युच्युअल फंडाला लहानपणापासून थेट सेवानिवृत्ती पर्यंत सर्वसामान्य माणसाच्या गुंतवणूकांचे व्यवस्थापन करीत असल्याचा अभिमान वाटतो. तो संपूर्ण जोखीम परतावा दृष्टिकोनातून प्रत्येक गरजेसाठी फंडांचे अनेक पर्याय देतो. इक्विटी फंड, हायब्रीड फंड्स आणि फिक्स्ड इन्कम फंड्स यामध्ये समाविष्ट असतात.

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

हीना उत्तमचंदानी

कार्पोरेट कम्युनिकेशन

ईमेल: huttamchandani@tataamc.com